# लोकमत समूहातर्फे औरंगाबाद मॅरेथॉन

## ११ डिसेंबर रोजी आयोजन : साताऱ्यातील स्टॉलला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सातारा** : तंदुरुस्तीसाठी धावणे हा जणू काही देशांमध्ये छंदच बनला आहे. त्याला औरंगाबाद हे शहर अपवाद नाही. धावण्याविषयी आणखी जागरुकता निर्माण व्हावी आणि तंदुरुस्तीचा संदेश नागरिकांमध्ये रुजावा, या उद्दात्त हेतूने 'लोकमत' समूहातर्फे दि. ११ डिसेंबर रोजी 'औरंगाबाद अर्ध मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर सातारा येथे उभारण्यात आलेल्या स्टॉलला सातारकरांनी उत्स्फूर्तपणे भेट देऊन मॅरेथॉनविषयी माहिती जाणून घेतली.

फिटनेसचा संदेश देणारी ही अर्ध मॅरेथॉन ५ किलोमीटरची 'फन रन' (रन फॉर पॅशन), १० किलोमीटरची पॉवर रन (प्राथमिक ते उच्च पातळीपर्यंत) आणि २१ किलोमीटर अशी असणार आहे. या आयोजनाविषयी रुचिरा दर्डा म्हणाल्या, 'नागरिक व खेळाडूंना फिटनेसाठी प्रेरणा मिळावी, हा आमचा प्रयत्न आहे. क्रीडाप्रेमींना प्रेरित करून त्यांनी सक्रियपणे फिटनेसवर लक्ष केंद्रित करावे आणि एक शिस्तबद्ध धावपटू कशाप्रकारे अद्भूत यश प्राप्त करु शकतो, हे अर्ध मॅरेथॉनद्वारे दाखवणे हादेखील या आयोजनामागचा उद्देश आहे. या अर्ध मॅरेथॉनमध्ये नागरिकांप्रमाणे अनेक दिग्गज खेळाडू सहभागी होऊन या स्पर्धेच्या भव्य दिव्यतेत भर टाकतील.

आयोजक धावपटूंसाठी लवकरच रनिंग क्लबची स्थापना करणार आहे. मोठ्या स्पर्धेच्या तयारीसाठी रनिंग ट्रायल देखील घेण्यात येईल. या मॅरेथॉनसाठी तब्बल ५ लाखांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

१० किलोमीटर व अर्ध मॅरेथॉनमध्ये अव्वल ठरणाऱ्यांना प्रमाणपत्र आणि मेडल्सही दिली जाणार आहे. ही मॅरेथॉन १. सिटी रन (शहराचे प्रतिनिधीत्त्व करणारे), २. क्लब रन (५ किलोमीटर क्लबचे नेतृत्त्व करणारे, ३. कॉलेच रन (५ किलोमीटर मॅरेथॉनमध्ये महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणारे, ४. कार्पोरेट रन (५ किलोमीटरमध्ये कंपनीचे प्रतिनिधीत्व करणारे).

दरम्यान, मॅरेथॉन स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर सातारा येथे उभारण्यात आलेल्या स्टॉलला सातारकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, डॉ. दीपक थोरात यांच्यासह अनेक नागरिकांनी या स्टॉलला भेट देऊन मॅरेथॉनविषयी माहिती जाणून घेतली. या मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी बेवसाईट mycitymarathon.com येथे आपल्या नावाची नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. (प्रतिनिधी)




सातारा येथील स्टॉलला भेट देवून आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, डॉ. दीपक थोरात यांनी औरंगाबाद मॅरेथॉन स्पर्धेची माहिती जाणून घेतली.

### असा असणार मार्ग

- हाफ मॅरेथॉन गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलापासून सुरु होईल
- ही मॅरेथॉन शहानूरमियां दर्गा, हॉटेल अमरप्रीत,सतीश मोटर्स शोरुम मार्गे निराला बाजार येथे पोहोचेल.
- त्यानंतर धावपटू मिल कॉर्नर, आमखास मैदान, नौबत दरवाजा, किलेअर्क, दिल्ली गेटे, हडको कॉर्नर, टीव्ही सेंटर, बळीराम पाटील हायस्कूल, बजरंग चौक, जळगाव रोड, हॉटेल लेमन ट्री, सेव्हन हिल पूल, गजानन महाराज मंदिर अशा मार्गाने जातील.
- मॅरेथॉनचा समारोप विभागीय क्रीडा संकुलावर होईल.

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016